# झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र, पुणे

(गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन)

II, मुथ्था चेंबर्स (विस्तार इमारत), सेनापती बापट मार्ग, पुणे – ४११०१६.
दूरध्वनी क्रमांक : ०२०–२५६३०२३४/३६ फॅक्स : ०२०–२५६३०२३५
ई–मेल : srapune@yahoo.in वेबसाईट : www.srapune.gov.in


जा.क्र./सहकार विभाग/झोपुप्रा/पुणे/२०१८/१५६५ दिनांक०१/०८/२०१८

**कार्यालयीन परिपत्रक क्र.१३/२०१८**

**विषय - नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थेचे दप्तर विकसकामार्फत संस्थेकडे जमा करणेबाबत.**

**प्रस्तावना :**

झोपडपटटी पुनर्वसन प्राधिकरण पुणे व पिंपरी चिंचवड क्षेत्र,पुणे यांचे कार्यक्षेत्रातील झोपडपटटी पुनर्वसन योजनेअंतर्गत बांधण्यात आलेल्या इमारतीमधील सभासदांची महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० अन्वये सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन करण्यात येते.सदर संस्था स्थापन करणेकरीता संबंधित योजनेचे विकसक,नियोजित संस्थेचे मुख्य प्रर्वतक या नात्याने सहकार विभागाकडे नोंदणी प्रस्ताव सादर करुन सहकारी गृहनिर्माण संस्थेची नोंदणी करुन घेतात.त्यानंतर नोंदणीकृत संस्थेच्या सभासदांमधुन महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील तरतुदीनुसार हंगामी समितीची रचना करण्यात येते.सदर समितीचा कालावधी जास्तीत जास्त १ वर्षापर्यंत असुन तदनंतर संस्थेच्या उपविधीमधील तरतुदीनुसार पुढील पाच वर्षाकरीता निवडणुकीदवारे संचालक मंडळाची रचना केली जाते.

या कार्यालयाचे असे निदर्शनास आले आहे की,बहुतांश सहकारी गृहनिर्माण संस्था नोंदणीनंतर संस्थेशी संबंधित दस्तऐवज विकसकामार्फत संस्थेच्या संचालक मंडळाकडे हस्तांतरीत केले जात नाही.त्यामुळे संस्थेचे दैनंदिन कामकाज करणे,वैधानीक लेखापरीक्षण करणे ,निवडणुक विषयक कामकाज करणे इ.कामामध्ये अडचणी निर्माण होतात.या परिपत्राकान्वये झोपुप्रा पुणे अंतर्गत येणा-या सर्व सहकारी गृहनिर्माण संस्थेशी संबंधित विकसक यांना सुचीत करण्यात येते की,त्यांनी त्यांचे योजनेशी संबंधित सहकारी गृहनिर्माण संस्थेचे खालील नमुद कागदपत्रांसह संपुर्ण दप्तर संबंधित सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या पदाधिका-यांकडे विनाविलंब सुपुर्द करुन त्याबाबतचे खालील नमुन्यातील ना हरकत प्रमाणपत्र सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था,झोपुप्रा,पुणे यांचेकडे विनाविलंब सादर करावे.याबाबत सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था,झोपुप्रा,पुणे यांचा अहवाल प्राप्त झालेनंतर तांत्रिक विभागाने संबंधित विकसक यांना देय असणारा शेवटच्या टप्प्यातील दहा टक्के टी.डी.आर.अदा करणेबाबतची कार्यवाही करावी.सदर परिपत्रकाचे काटेकोर पालन होईल याची दक्षता घेणेत यावी.

-ना हरकत प्रमाणपत्राचा नमुना -

## ना हरकत प्रमाणपत्र

यादवारे प्रमाणित करण्यात येते की,------------सहकारी गृहनिर्माण संस्था------- नोंदणी क्रमांक------- ----------- दिनांक --------- पत्ता----------------------------------- या गृहनिर्माण संस्थेचे विकसक/मुख्य प्रवर्तक श्री/श्रीमती----------------------------- यांनी संस्था नोंदणीबाबतचे खालील नमुद दप्तर व लेखा तसेच इतर आवश्यक दस्तऐवज संस्थेचे अध्यक्ष,सचिव व खजिनदार श्री./श्रीमती १.---------------------२.------------ ३.----------------------------- यांचेकडे आज दिनांक रोजी संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र ,अभिहस्तांतरण प्रमाणपत्र,अधिसुचना,ज्ञापन,मंजुर उपविधीची प्रत,सभासदांची यादी,भाग प्रमाणपत्र,नमुना आय नमुना,जे रजिस्टर,वारस नोंद रजिस्टर,रोजकिर्द,प्रथम सभेचे इतिवृत्त,संचालक मंडळ मासिक सभेचे इतिवृत्त,बँक खातेउतारा,पासबुक,योजनेशी संबंधित विविध शासकीय विभागांचे मंजुरी आदेश,नकाशे,जागेचे मालकी हक्कबाबतची कागदपत्रे रीतसर सुपुर्द केले असुन सदरचे दप्तर आमचे संस्थेचे ताब्यात मिळालेमुळे संस्थेची याबाबत कसलीही हरकत नाही,करीता हे प्रमाणपत्र दिले असे.

स्वाक्षरी -

१.अध्यक्ष --------------- ------------

स्थळ- २.सचिव --------------- -----------

दिनांक - ३.खजिनदार ------------- -----------

मुख्य कार्यकारी अधिकारी

झोपुप्रा,पुणे

प्रत -

१. विकसक (सर्व) झोपुप्रा,पुणे

२. मा.सहाय्यक संचालक नगररचना,झोपुप्रा,पुणे

३.प्रशासन शाखा ,झोपुप्रा,पुणे यांना मुळ नस्तीमध्ये समाविष्ट करणेसाठी.